भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

# बाल-विवाह प्रतिबंध अधिनियम, २००६

**(सन २००७ चा अधिनियम क्रमांक ६)**

[१३ जुलै २०१६ रोजी यथाविद्यमान]

# The Prohibition of Child Marriage Act, 2006

**(Act No. 6 of 2007)**

[*As in force on the 13th July 2016*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

**२०१६**

[**किंमत** : रुपये २९.००]

**प्राक्कथन**

या आवृत्तीत, दिनांक १३ जुलै २०१६ रोजी यथाविद्यमान असलेला दि प्रोहिबिशन ऑफ चाईल्ड मॅरीज ॲक्ट, २००६ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १७, अंक २, दिनांक २२ सप्टेंबर २०१६ यात पृष्ठे ३ ते ७ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता.

हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतीच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २२ सप्टेंबर २०१६.

**डॉ. जी. नारायण राजू,**
सचिव, भारत सरकार.

PREFACE

This edition of The Prohibition of Child Marriage Act, 2006 as on the 13th July 2016 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India,* Extraordinary, Part XII, Section I, Vol. 17, No. 2, dated 22nd September 2016 on pages 3 to 7.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, clause (*a*) of the Authoritative Text (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 22nd September 2016.

DR. G. NARAYAN RAJU,
Secretary to the Government of India.

# बाल-विवाह प्रतिबंध अधिनियम, २००६

## कलमांचा क्रम

**कलमे**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. विवाहपक्ष बालक असल्यास त्याच्या विकल्पानुसार तो बाल-विवाह शुन्यकरणीय असणे.

४. बाल-विवाहाच्या स्त्री विवाहपक्षाचा निर्वाहखर्च व निवास यांसाठी तरतूद.

५. बाल-विवाहातून जन्मलेल्या अपत्यांचा ताबा व निर्वाहखर्च.

६. बाल-विवाहातून जन्मलेल्या अपत्यांची औरसता.

७. कलम ४ किंवा कलम ५ याअन्वये काढण्यात आलेल्या आदेशांमध्ये फेरबदल करण्याचा जिल्हा न्यायालयाचा अधिकार.

८. ज्या न्यायालयात याचिका करावयाची ते न्यायालय.

९. बालिकेशी विवाह करणाऱ्या प्रौढ पुरुषाला शिक्षा.

१०. बाल-विवाह विधिपूर्वक लावण्याबद्दल शिक्षा.

११. बाल-विवाह विधिपूर्वक लावण्यासाठी चालना किंवा परवानगी देणाऱ्यास शिक्षा.

१२. विवक्षित परिस्थितीत अज्ञान बालकाचा विवाह शून्यवत ठरणे.

१३. बाल-विवाहास प्रतिबंध करणारा मनाईहुकूम काढण्याचा न्यायालयाचा अधिकार.

१४. मनाईहुकुमांचे उल्लंघन करुन होणारे बाल-विवाह शून्यवत असणे.

१५. अपराध दखलपात्र व अजामीनपात्र असणे.

१६. बाल-विवाह प्रतिबंध अधिकारी.

१७. बाल-विवाह प्रतिबंध अधिकारी हे लोकसेवक असणे.

१८. सद्भावपूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.

१९. राज्य शासनाचा नियम करण्याचा अधिकार.

२०. सन १९५५ चा अधिनियम क्रमांक २५ ची सुधारणा.

२१. निरसन व व्यावृत्ती.

# बाल-विवाह प्रतिबंध अधिनियम, २००६

(२००७ चा अधिनियम क्रमांक ६)

[१३ जुलै २०१६ रोजी यथाविद्यमान]

[१० जानेवारी, २००७]

**बाल-विवाह विधिपूर्वक लावण्यास प्रतिबंध करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी, संसदेद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**

**१.** (१) या अधिनियमास, बाल-विवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ असे म्हणावे.

(२) तो, जम्मू व काश्मीर राज्य खेरीज करून संपूर्ण भारतास लागू आहे आणि तो, भारताबाहेरील व भारता पलिकडील सर्व भारतीय नागरिकांनाही लागू आहे :

परंतु असे की, या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट पाँडेचरीच्या संघ राज्यक्षेत्रातील रनोन्साँ (संत्यागी) यांना लागू असणार नाही.

(३) तो, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल ; आणि निरनिराळ्या राज्यांकरिता निरनिराळे दिनांक नियत करता येतील आणि या अधिनियमाच्या प्रारंभासंबंधातील कोणत्याही तरतुदीमधील कोणत्याही निर्देशाचा एखाद्या राज्याच्या संबंधातील अन्वयार्थ, त्या राज्यात ती तरतूद अमलात येण्याबाबतच्या निर्देशाप्रमाणे लावण्यात येईल.

**व्याख्या.**

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " बालक " याचा अर्थ, पुरुष असल्यास वयाची एकवीस वर्षे पूर्ण न झालेली, आणि स्त्री असल्यास, वयाची अठरा वर्षे पूर्ण न झालेली व्यक्ती, असा आहे ;

(ख) " बाल-विवाह " याचा अर्थ, विवाहातील कोणताही एक विवाहपक्ष हा बालक असेल असा विवाह, असा आहे ;

(ग) विवाहाच्या संबंधात " विवाहपक्ष " याचा अर्थ, ज्यांचा विवाह विधिपूर्वक लावण्यात येत आहे किंवा लावण्यात येणार आहे असा कोणताही पक्ष, असा आहे ;

(घ) " बाल-विवाह प्रतिबंध अधिकारी " या संज्ञेत, कलम १६, पोटकलम (१) अन्वये नियुक्ती करण्यात आलेला बाल-विवाह प्रतिबंध अधिकारी, यांचा समावेश होतो ;

**१९८४ चा ६६.**

(ङ) " जिल्हा न्यायालय " याचा अर्थ, ज्या कोणत्याही क्षेत्रात कुटुंब न्यायालय अधिनियम, १९८४ याच्या कलम ३ अन्वये कुटुंब न्यायालय स्थापन करण्यात आले असेल त्या क्षेत्रात, असे कुटुंब न्यायालय, अणि ज्या कोणत्याही क्षेत्रात कुटुंब न्यायालय नसेल, परंतु नगर दिवाणी न्यायालय असेल त्या क्षेत्रात ते न्यायालय, आणि इतर कोणत्याही क्षेत्रात मूळ अधिकारितेचे मुख्य दिवाणी न्यायालय, असा आहे आणि त्यामध्ये, या अधिनियमातील बाबींसंबंधात अधिकारिता असलेले न्यायालय म्हणून राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा, अन्य दिवाणी न्यायालयाचा समावेश होतो ;

**१८७५ चा ९.**

(च) " अज्ञान " याचा अर्थ, सज्ञानता अधिनियम, १८७५ याच्या तरतुदींअन्वये जी व्यक्ती सज्ञान झाली नसल्याचे मानले जाईल अशी व्यक्ती, असा आहे.

**विवाहपक्ष बालक असल्यास त्याच्या विकल्पानुसार तो बाल-विवाह शून्यकरणीय असणे.**

**३.** (१) प्रत्येक बाल-विवाह-मग तो या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा नंतर विधिपूर्वक लावण्यात आलेला असो-विवाहाच्या वेळी जो विवाहपक्ष बालक होता, त्याच्या विकल्पानुसार शून्यकरणीय असेल :

परंतु असे की, विवाह निरर्थक ठरवणाऱ्या हुकूमनाम्याद्वारे बाल-विवाह निर्भावित करण्यासाठी, विवाहाच्या वेळी विवाहातील जो विवाहपक्ष बालक होता त्या पक्षासच केवळ, जिल्हा न्यायालयामध्ये याचिका दाखल करता येईल.

(२) याचिका दाखल करतेवेळी याचिकाकर्ता अज्ञान असेल तर, बाल-विवाह प्रतिबंध अधिकाऱ्यासमवेत याचिकाकर्त्याचा पालक किंवा वादमित्र यांच्यामार्फत याचिका दाखल करता येईल.

(३) या कलमाखालील याचिका, कोणत्याही वेळी, मात्र याचिकाकर्ता बालकाची सज्ञानतेची दोन वर्षे पूर्ण होण्यापूर्वी दाखल करता येईल.

(४) या कलमान्वये विवाह निरर्थक ठरवणारा हुकूमनामा देताना, जिल्हा न्यायालय, विवाहातील दोन्ही पक्षांना आणि त्यांचे मातापिता किंवा पालक यांना, विवाहप्रसंगी दुसऱ्या पक्षाकडून त्यांना मिळालेला पैसा, मूल्यवान वस्तू दागदागिने, आणि इतर अहेराच्या वस्तू किंवा अशा मूल्यवान वस्तू, दागदागिने, इतर अहेराच्या वस्तू आणि पैसा यांच्या मूल्याइतकी रक्कम, दुसऱ्या पक्षाला, त्याच्या किंवा तिच्या मातापित्यांना किंवा, यथास्थिति, पालकाला, परत करण्याचे निदेश देणारा आदेश काढील :

परंतु असे की, संबंधित पक्षांना जिल्हा न्यायालयासमोर हजर राहण्याची आणि असे आदेश का काढू नये, याबाबत कारण दाखविण्याची नोटीस दिल्याखेरीज, या कलमान्वये कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

**बाल-विवाहाच्या स्त्री विवाहपक्षाचा निर्वाहखर्च व निवास यांसाठी तरतूद.**

**४.** (१) कलम ३ अन्वये हुकूमनामा देताना, जिल्हा न्यायालय, बाल-विवाहातील पुरुष विवाहपक्षाला आणि अशा विवाहातील पुरुष विवाहपक्ष अज्ञान असेल तर त्याचे मातापिता किंवा पालक यांना स्त्री विवाहपक्षाला तिच्या पुनर्विवाहापर्यंत निर्वाहखर्च देण्याचा, अंतरिम किंवा अंतिम आदेश, देऊ शकेल.

(२) बालिकेच्या गरजा, विवाहित असताना ती उपभोगत असलेले राहणीमान आणि निर्वाहखर्च देणाऱ्या पक्षाच्या उत्पन्नाचे साधन, या गोष्टी विचारात घेऊन जिल्हा न्यायालय, प्रदान करावयाच्या निर्वाहखर्चाचे प्रमाण निर्धारित करील.

(३) निर्वाहखर्च दरमहा किंवा एकरकमी प्रदान करण्याचा निदेश देता येईल.

(४) कलम ३ अन्वये याचिका करणारा पक्ष हा जर स्त्री विवाहपक्ष असेल तर जिल्हा न्यायालयास तिच्या पुनर्विवाहापर्यंत तिच्या निवासाबाबतही योग्य तो आदेश काढता येईल.

**बाल-विवाहातून जन्मलेल्या अपत्यांचा ताबा व निर्वाहखर्च.**

**५.** (१) बाल-विवाहातून जर अपत्यांचा जन्म झाला असेल तर अशा अपत्यांच्या ताब्यासाठी, जिल्हा न्यायालय समुचित आदेश देईल.

(२) या कलमान्वये अपत्याच्या ताब्यासाठी आदेश काढताना जिल्हा न्यायालय, अपत्याचे कल्याण आणि सर्वाधिक हित या बाबी प्रामुख्याने विचारात घेईल.

(३) अपत्याच्या ताब्याच्या आदेशामध्ये, अपत्याचे सर्वाधिक हित जोपासले जाईल अशा रीतीने दुसऱ्या पक्षाला अपत्याला भेटण्याची मुभा कशी देता येईल याबाबत यथोचित निदेश आणि बालकाच्या हितासाठी जिल्हा न्यायालय उचित मानील, असे अन्य आदेश देखील, अंतर्भूत असतील.

(४) जिल्हा न्यायालयास, विवाहातील पक्ष किंवा त्यांचे मातापिता वा पालक यांच्याकडून, अपत्याच्या निर्वाहखर्चाची तरतूद करण्यासाठी देखील समुचित आदेश काढता येईल.

**बाल-विवाहातून जन्मलेल्या अपत्यांची औरसता.**

**६.** कलम ३ अन्वये विवाह निरर्थक ठरवणाऱ्या हुकूमनाम्याद्वारे बाल-विवाह जरी निर्भावित झाला तरीही, हुकूमनामा देण्यापूर्वी अशा विवाहातून जन्मलेले किंवा गर्भावस्थेत असलेले कोणतेही अपत्य-मग ते या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा नंतर जन्मास आलेले असो-सर्व प्रयोजनार्थ औरस अपत्य असल्याचे मानण्यात येईल.

**कलम ४ किंवा कलम ५ यांअन्वये काढण्यात आलेल्या आदेशांमध्ये फेरबदल करण्याचा जिल्हा न्यायालयाचा अधिकार.**

**७.** याचिका प्रलंबित असताना, इतकेच नव्हे तर ती अंतिमतः निकालात काढल्यानंतर देखील कोणत्याही वेळी, परिस्थितीमध्ये बदल झाल्यास, कलम ४ किंवा कलम ५ यांअन्वये काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशामध्ये भर घालण्याचा, त्यात फेरबदल करण्याचा व तो मागे घेण्याचा अधिकार जिल्हा न्यायालयाला असेल.

**ज्या न्यायालयात याचिका करावयाची ते न्यायालय.**

**८.** कलम ३, ४ व ५ यांअन्वये अनुतोष देण्याच्या प्रयोजनार्थ अधिकारिता असलेल्या जिल्हा न्यायालयात, प्रतिवादी किंवा बालक ज्या ठिकाणी राहत असेल किंवा ज्या ठिकाणी विवाह विधिपूर्वक लावण्यात आला असेल किंवा ज्या ठिकाणी विवाहपक्ष शेवटचे एकत्र राहिले असतील किंवा याचिका दाखल केल्याच्या दिवशी याचिकाकर्ता ज्या ठिकाणी राहत असेल, अशा ठिकाणावर अधिकारिता असलेल्या जिल्हा न्यायालयाचा अंतर्भाव असेल.

**९.** अठरा वर्षांवरील जो कोणी प्रौढ पुरुष बाल-विवाह करील, तो दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या सश्रम कारावासाच्या किंवा एक लाखापर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस, पात्र असेल. **बालिकेशी विवाह करणाऱ्या प्रौढ पुरुषाला शिक्षा.**

**१०.** जो कोणी, बाल-विवाह लावील, त्याचे चालन करील, त्याचे निदेशन करील किंवा त्यास अपप्रेरणा देईल त्याने, तो विवाह बाल-विवाह नव्हता असे त्याला सकारण वाटत असल्याचे सिद्ध न केल्यास, त्याला दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या सश्रम कारावासाची आणि एक लाख रुपयापर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल. **बाल-विवाह विधिपूर्वक लावण्याबद्दल शिक्षा.**

**११.** (१) जेव्हा एखादे बालक बाल-विवाह करील त्या बालकास सांभाळणारी व्यक्ती मग-मातापिता म्हणून असो किंवा पालक म्हणून असो किंवा अन्य कोणतीही व्यक्ती असो किंवा कायदेशीर वा बेकायदेशीर अशा अन्य कोणत्याही नात्याने कोणतीही अन्य व्यक्ती म्हणून असो, तसेच व्यक्तींच्या एखाद्या संघटनेचा किंवा संघाचा सदस्य म्हणून असो-विवाहास चालना देणारी कोणतीही कृती करील किंवा तो विधिपूर्वक लावण्यास परवानगी देईल किंवा तो विधिपूर्वक लावण्यास प्रतिबंध करण्यात हलगर्जीपणाने कसूर करील–यामध्ये बाल-विवाहास उपस्थित राहणारी किंवा त्यात सहभागी होणारी व्यक्ती यांचाही समावेश होतो–ती व्यक्ती, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस आणि एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेसदेखील पात्र होईल : **बाल-विवाह विधिपूर्वक लावण्यासाठी चालना किंवा परवानगी देणाऱ्यास शिक्षा.**

परंतु असे की, कोणत्याही महिलेस कारावासाची शिक्षा होणार नाही.

(२) या कलमाच्या प्रयोजनार्थ, एतद्‌विरुद्ध काहीही शाबीत झालेले नसेल तर तोपर्यंत, असे गृहीत धरण्यात येईल की, अज्ञान बालकाचा विवाह झाला असेल अशा प्रकरणात अज्ञान बालकाला सांभाळणाऱ्या व्यक्तीने विवाह विधिपूर्वक लावण्यास प्रतिबंध करण्यात हलगर्जीपणाने कसूर केली आहे.

**१२.** जेथे बालक अज्ञान असेल तेथे,– **विवक्षित परिस्थितीत अज्ञान बालकाचा विवाह शून्यवत ठरणे.**

(क) त्याला कायदेशीर पालकाच्या ताब्यातून काढून घेण्यात आले असेल किंवा भुरळ पाडून नेण्यात आले असेल ; किंवा

(ख) त्याला एखाद्या जागेतून निघून जाण्यास जबदस्तीने भाग पाडले असेल किंवा कपटाने प्रवृत्त केले असेल ; किंवा

(ग) विवाहाच्या प्रयोजनार्थ त्याची विक्री करण्यात आली असेल आणि कोणत्याही प्रकारे विवाह करण्यास त्याला भाग पाडले असेल किंवा अज्ञान बालकाचा विवाह केल्यानंतर त्याची विक्री किंवा त्याचा अपव्यापार करण्यात आला असेल किंवा अनैतिक प्रयोजनार्थ त्याचा वापर करण्यात आला असेल तर,

असा विवाह रद्दबातल ठरेल.

**१३.** (१) या अधिनियमात एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, बाल-विवाह प्रतिबंध अधिकाऱ्याने अर्ज केल्यावरून किंवा तक्रारीद्वारे किंवा अन्य प्रकारे कोणत्याही व्यक्तीकडून माहिती मिळाल्यावरून प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी किंवा महानगर दंडाधिकारी यांची, अधिनियमाचे उल्लंघन करणारा बाल-विवाह आयोजित करण्यात आला आहे किंवा विधिपूर्वक लावण्यात येणार आहे, अशी खात्री पटली तर, असा दंडाधिकारी, व्यक्तीची एखादी संघटना किंवा संघ यांचे सदस्य असलेल्या व्यक्तीसह कोणत्याही व्यक्तीविरुद्ध, अशा बाल-विवाहास प्रतिबंध करणारा मनाईहुकूम काढील. **बाल-विवाहास प्रतिबंध करणारा मनाईहुकूम काढण्याचा न्यायालयाचा अधिकार.**

(२) बाल-विवाह विधिपूर्वक लावण्यात येत आहे किंवा येत आहेत याबाबत वैयक्तिक माहिती असलेली किंवा तसे सकारण वाटत असलेली कोणतीही व्यक्ती आणि त्या संभाव्यतेशी संबंधित वाजवी माहिती असणारी संघटना यांना पोट-कलम (१) अन्वये तक्रार करता येईल.

(३) एखादे विश्वसनीय वृत्त किंवा माहिती यांच्या आधारे प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी किंवा महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालय यांना देखील स्वतः होऊन दखल घेता येईल.

(४) अक्षय्य तृतीयेसारख्या विवक्षित दिवशी विधिपूर्वक लावण्यात येणाऱ्या सामूहिक बाल-विवाहांना प्रतिबंध करण्याच्या प्रयोजनाकरिता, जिल्हा दंडाधिकारी हा, बाल-विवाह प्रतिबंध अधिकाऱ्याकडे या अधिनियमाअन्वये किंवा तदन्वये प्रदान करण्यात आलेले सर्व अधिकार असलेला, बाल-विवाह प्रतिबंध अधिकारी असल्याचे मानण्यात येईल.

(५) जिल्हा दंडाधिकाऱ्याला, बाल-विवाह विधिपूर्वक लावणे थांबविण्याचे किंवा त्यास प्रतिबंध करण्याचे अतिरिक्त अधिकार देखील असतील आणि या प्रयोजनार्थ त्यास सर्व समुचित उपाययोजना करता येतील आणि आवश्यक किमान बलाचा वापर करता येईल.

(६) न्यायालयाने, कोणतीही व्यक्ती, किंवा यथास्थिति, व्यक्तींच्या एखाद्या संघटनेचा वा संघांचा सदस्य यांना अगोदर नोटीस देऊन आणि मनाईहूकूम का काढू नये याची कारणे दाखवण्याची तिला किंवा त्यांना संधी दिलेली नसेल तर, अशी व्यक्ती किंवा व्यक्तींची कोणतीही संघटना किंवा संघ यांचा सदस्य यांच्या विरोधात पोटकलम (१) अन्वये कोणताही मनाईहुकूम काढता येणार नाही :

परंतु असे की, न्यायालयाला, कोणत्याही निकडीच्या प्रसंगी, या कलमान्वये कोणतीही नोटीस न देता अंतरिम मनाईहुकूम काढण्याचा अधिकार असेल.

(७) पोटकलम (१) अन्वये काढण्यात आलेला मनाईहुकूम, हा ज्या पक्षाच्या विरोधात काढण्यात आला आहे त्या पक्षाला नोटीस दिल्यानंतर आणि त्याचे म्हणणे ऐकल्यानंतर, कायम करण्यात येईल किंवा विलोपित करण्यात येईल.

(८) न्यायालयास, एकतर स्वतःहून किंवा कोणत्याही व्यथित व्यक्तीच्या अर्जावरून, पोट-कलम (१) अन्वये काढलेला मनाईहुकूम विखंडित करता येईल किंवा त्यात फेरफार करता येतील.

(९) पोटकलम (१) अन्वये अर्ज प्राप्त झाला असेल त्याबाबतीत, न्यायालय, अर्जदाराला एकतर व्यक्तिशः किंवा वकिलाद्वारे आपले म्हणणे मांडण्याची संधी लवकरात लवकर देईल आणि अर्जदाराचे म्हणणे ऐकल्यावर जर न्यायालयाने अर्ज संपूर्णपणे किंवा अंशतः फेटाळला तर ते, तसे करण्याची कारणे लेखी नमूद करील.

(१०) जो कोणी, पोटकलम (१) अन्वये त्याच्या विरुद्ध मनाईहुकूम काढण्यात आल्याचे माहीत असूनही, अशा मनाईहुकूमाचे पालन करणार नाही, तो दोन वर्षांपर्यंत असू शकेल अशा एका स्वरुपाच्या कारावसाच्या किंवा एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल :

परंतु असे की, कोणतीही महिला कारावासाच्या शिक्षेस पात्र असणार नाही.

**मनाईहुकूमांचे उल्लंघन करून होणारे बाल-विवाह शून्यवत असणे.**

**१४.** कलम १३ अन्वये काढलेल्या मनाईहुकूमांचे–मग तो अंतरिम असो वा अंतिम–उल्लंघन करून विधिपूर्वक लावण्यात आलेला कोणताही बाल-विवाह प्रारंभापासून शून्यवत असेल.

**अपराध दखलपात्र व अजामीनपात्र असणे.**

**१५.** फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ यात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असणारा अपराध हा दखलपात्र व अजामीनपात्र असेल. **१९७४ चा २.**

**बाल-विवाह प्रतिबंध अधिकारी.**

**१६.** (१) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, संपूर्ण राज्याकरिता किंवा त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा राज्याच्या भागाकरिता, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रासाठी किंवा क्षेत्रांसाठी अधिकारिता असलेला बाल-विवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या अधिकाऱ्याची किंवा अधिकाऱ्यांची, नियुक्ती करील.

(२) राज्य शासनास, त्या वस्तीमधील समाजसेवेची पार्श्वभूमी असलेल्या आदरणीय व्यक्तीला किंवा ग्राम पंचायतीच्या किंवा नगरपालिकेच्या अधिकाऱ्याला किंवा शासनाच्या किंवा सार्वजनिक उपक्रमाच्या अधिकाऱ्याला किंवा अशासकीय संघटनेच्या पदाधिकाऱ्याला, बाल-विवाह प्रतिबंध अधिकाऱ्याला साहाय्य करण्याविषयी विनंती देखील करता येईल आणि अशी व्यक्ती, अधिकारी किंवा, यथास्थिति, पदाधिकारी, त्यानुसार कृती करण्यास बांधील असेल.

(३) बाल-विवाह प्रतिबंध अधिकाऱ्याची पुढील कर्तव्ये असतील :—

(क) बाल-विवाह विधिपूर्वक लावण्यास प्रतिबंध करण्यासाठी त्याला योग्य वाटेल अशी कारवाई करणे ;

(ख) या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर प्रभावीपणे खटला चालविण्याकरिता साक्षीपुरावा गोळा करणे ;

(ग) एकतर वैयक्तिक प्रकरणांत सल्ला देणे किंवा वस्तीमधील रहिवाशांना बाल-विवाह विधिपूर्वक लावण्यात, चालना देण्यात, मदत करण्यात, साहाय्य करण्यात किंवा मुभा देण्यात सहभागी न होण्याबाबत सर्वसाधारणपणे समुपदेशन करणे ;

(घ) बाल-विवाहातून निर्माण होणाऱ्या अनिष्ट गोष्टींबाबत जाणीव निर्माण करणे ;

(ङ) बाल-विवाहाच्या प्रश्नाबाबत समाजामध्ये संवेदनशीलता निर्माण करणे ;

(च) राज्य शासन निदेश देईल अशी नियतकालिक विवरणे व आकडेवारी सादर करणे ; आणि

(छ) राज्य शासन त्यास नेमून देईल अशी अन्य कार्ये व कर्तव्ये पार पाडणे.

(४) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, तीत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्ती व मर्यादा यांच्या अधीन राहून, पोलीस अधिकाऱ्यांचे तीत विनिर्दिष्ट करण्यात येतील असे अधिकार, बाल-विवाह प्रतिबंध अधिकाऱ्याकडे विनिहित करील आणि बाल-विवाह प्रतिबंध अधिकारी, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना व मर्यादांना अधीन राहून, अशा अधिकारांचा वापर करील.

(५) बाल-विवाह प्रतिबंध अधिकाऱ्याला कलम ४, ५ व १३ खालील आदेशाकरिता आणि कलम ३ अन्वये बालकासहित, न्यायालयाकडे दाद मागण्याचा अधिकार असेल.

**बाल-विवाह प्रतिबंध अधिकारी हे लोकसेवक असणे.**

१८६० चा ४५. **१७.** बाल-विवाह प्रतिबंध अधिकारी हे, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**सद्भावपूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.**

**१८.** हा अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेला कोणताही नियम किंवा आदेश यांना अनुसरून सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करावयाचा इरादा असलेल्या कोणत्याही कृतीच्या बाबतीत, बाल-विवाह प्रतिबंध अधिकाऱ्याच्या विरुद्ध, कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**राज्य शासनाचा नियम करण्याचा अधिकार.**

**१९.** (१) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याकरिता नियम करू शकेल.

(२) या अधिनियमाअन्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यावर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळासमोर मांडण्यात येईल.

**सन १९५५ चा अधिनियम क्रमांक २५ ची सुधारणा.**

**२०.** हिंदू विवाह अधिनियम, १९५५ याच्या कलम १८ मध्ये, खंड (क) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(क) कलम ५ च्या खंड (तीन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींचे उल्लंघन झाल्यास, दोन वर्षांपर्यंत असू शकेल अशा सश्रम कारावासाची किंवा एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील".

**निरसन व व्यावृत्ती.**

१९२९ चा १९. **२१.** (१) बाल-विवाह विरोधी अधिनियम, १९२९ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरीही, या अधिनियमाच्या प्रारंभी उक्त अधिनियमाखाली प्रलंबित किंवा चालू असलेली सर्व प्रकरणे व अन्य कार्यवाही ही, जणू काही हा अधिनियम संमत झालेला नव्हता असे मानून निरसित अधिनियमाच्या तरतुदींनुसार चालू राहील व निकालात काढली जाईल.

# The Protection of Child Marriage Act, 2006

## बाल-विवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| ab initio | प्रारंभापासून | [S. 14] |
| abet | अपप्रेरणा देणे | [S. 10] |
| alter | फेरफार करणे | [S. 13 (8)] |
| annulling | निर्भावित करणे | [S. 3(2) (Proviso)] |
| any member of an organisation or association of persons | व्यक्तींच्या एखाद्या संघटनेचा किंवा संघाचा सदस्य | [S. 11 (1)] |
| begotten | जन्मलेले | [S. 6] |
| by deceitful means | कपटाने | [S. 12 (b)] |
| child | बालक | [S. 2 (a)] |
| child marriage | बाल-विवाह | [S. 2 (b)] |
| Child Marriage Prohibition Officer | बाल-विवाह प्रतिबंध अधिकारी | [S. 16 M. N.] |
| children | अपत्य | [S. 5 (1)] |
| community | समाज | [S. 16 (3) (e)] |
| conceived | गर्भावस्थेत असलेले | [S. 6] |
| conduct | चालन करणे | [S. 10] |
| contracting party | विवाहपक्ष | [S. 2 (c)] |
| contravention | उल्लंघन | [S. 14] |

| | | |
|---|---|---|
| defendant | प्रतिवादी | [S. 8] |
| direct | निदेश देणे | [S. 10] |
| entice | भुरळ पाडणे | [S. 12 (a)] |
| evil | अनिष्ट गोष्ट | [S. 16 (3) (d)] |
| induce | प्रवृत्त करणे | [S. 12 (b)] |
| indulge | सहभागी होणे | [S. 16 (3) (c)] |
| injunction | मनाईहुकूम | [S. 13 (1)] |
| interim or final order | अंतरिम किंवा अंतिम आदेश | [S. 4 (1)] |
| invest | विनिहित करणे | [S. 16 (4)]) |
| issue | प्रश्न | [S. 16 (3) (e)] |
| legitimacy | औरसता | [S. 6 M. N.] |
| majority | सज्ञानवयता | [S. 3 (3)] |
| modify | फेरबदल | [S. 7] |
| move the court | न्यायालयाकडे दाद मागणे | [S. 16 (5)] |
| next friend | वादमित्र | [S. 3 (2)] |
| non-bailable | बिन जामिनी | [S. 15] |
| nullity | निरर्थक ठरवणे | [S. 3 (1) (proviso)] |
| ornaments | दागदागिने | [S. 3(4)] |
| other gifts | अहेराच्या अन्य वस्तू | [S. 3 (4)] |

| | | |
|---|---|---|
| periodical returns | नियतकालिक विवरणे | [S. 16 (3) (f)] |
| prohibiting of child marriage | बाल-विवाह प्रतिबंध | [S. 13 M. N.] |
| reliable report | विश्वसनीय वृत्त | [S. 13 (3)] |
| renoncants | रेनॉन्कन्ट्स (संत्यागी) | [S. 1 (2) (Proviso)] |
| rescind | विखंडित करणे | [S. 13 (8)] |
| revoke | मागे घेणे | [S. 7] |
| sensitize | संवेदनशीलता | [S. 16 (3) (e)] |
| solemnisation of child marriage | बाल-विवाह विधिपूर्वक लावणे | [S. 16 (3) (c)] |
| statistics | आकडेवारी | [S. 16 (3) (f)] |
| trafficked | अपव्यापार करणे | [S. 12 (c)] |
| vacate | विलोपित करणे | [S. 13 (7)] |
| valuables | मुल्यवान वस्तू | [S. 3 (4)] |
| void | शून्यवत | [S. 14] |
| voidable | शून्यकरणीय | [S. 3 (1)] |

बाल-विवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६

The Protection of Child-Marriage Act, 2006

मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अंतरिम किंवा अंतिम आदेश | interim or final order | [क. ४ (१)] |
| अनिष्ट गोष्ट | evil | [क. १६ (३) (घ)] |
| अपत्य | children | [क. ५ (१)] |
| अपप्रेरणा देणे | abet | [क. १०] |
| अपव्यापार करणे | trafficked | [क. १२ (ग)] |
| अहेराच्या अन्य वस्तू | other gifts | [क. ३ (४)] |
| आकडेवारी | statistics | [क. १६ (३)(च)] |
| उल्लंघन | contravention | [क. १४] |
| औरसता | legitimacy | [क. ६ स. टी.] |
| कपटाने | by deceitful means | [क. १२ (ख)] |
| गर्भावस्थेत असलेले | conceived | [क. ६] |
| चालन करणे | conduct | [क. १०] |
| जन्मलेले | begotten | [क. ६] |
| दागदागिने | ornaments | [क. ३ (४)] |
| निदेश देणे | direct | [क. १०] |
| नियतकालिक विवरणे | periodical returns | [क. १६ (३) (च)] |
| निरर्थक ठरवणे | nullity | [क. ३(१) (परंतुक)] |
| निर्भावित करणे | annulling | [क. ३(२) (परंतुक)] |

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाकडे दाद मागणे | move the court | [क. १६ (५)] |
| प्रतिवादी | defendant | [क. ८] |
| प्रवृत्त करणे | induce | [क. १२(ख)] |
| प्रश्न | issue | [क. १६(३) (ङ)] |
| प्रारंभापासून | ab initio | [क. १४] |
| फेरफार करणे | alter | [क. १३(८)] |
| फेरबदल | modify | [क. ७] |
| बालक | child | [क. २ (क)] |
| बाल-विवाह | child-marriage | [क. २ (ख)] |
| बाल-विवाह प्रतिबंध | prohibiting child marriage | [क. १३ स.टी.] |
| बाल-विवाह प्रतिबंध अधिकारी | Child Marriage Prohibition Officer | [क. १६ स.टी.] |
| बाल-विवाह विधीपूर्वक लावणे | solemnisation of child marriage | [क. १६ (३) (ग)] |
| बिन जामिनी | non-bailable | [क. १५] |
| भुरळ पाडणे | entice | [क. १२ (क)] |
| मनाईहुकूम | injunction | [क. १३ (१)] |
| मागे घेणे | revoke | [क. ७] |
| मूल्यवान वस्तू | valuables | [क. ३ (४)] |
| रेनॉन्कन्ट्स (संत्यागी) | renoncants | [क. १(२) (परंतुक)] |

| | | |
|---|---|---|
| वादमित्र | next friend | [क. ३ (२)] |
| विखंडित करणे | rescind | [क. १३ (८)] |
| विनिहित करणे | invest | [क. १६ (४)] |
| विलोपित करणे | vacate | [क. १३ (७)] |
| विवाहपक्ष | contracting party | [क. २ (ग)] |
| विश्‍वसनीय वृत्त | reliable report | [क. १३ (३)] |
| व्यक्तीच्या एखाद्या संघटनेचा किंवा संघाचा सदस्य | any member of an organisation or association of persons | [क. ११ (१)] |
| शून्यकरणीय | voidable | [क. ३ (१)] |
| शून्यवत | void | [क. १४] |
| संवेदनशीलता | sensitize | [क. १६ (३) (ङ)] |
| सज्ञानवयता | majority | [क. ३ (३)] |
| समाज | community | [क. १६ (३) (ङ)] |
| सहभागी होणे | indulge | [क. १६ (३) (ग)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई